परवानगी वर्ष : २००२-२००३
माध्यम : मराठी
कायम विना अनुदान

२२४४/०२

जा.क्रं.माध्य-३/१४/प्रथम मान्यता/पुवि/०४
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे - १ यांचे कार्यालय
दिनांक :- 1 OCT 2004

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, पुणे

विषय :- प्रथम मान्यता . . . . .
स्व. आबासाहेब पाचंगे विद्यालय, ढोकसांगवी, ता. शिरुर, जि. पुणे

संदर्भ :- १. आपले पत्र क्रं. शिक्षण/माध्य/ह-४/२९८/०४-०५ दिनांक ३०.९.२००४
२. शा.प.क्रं. नमाशा १००१/ (४२/२००१)/ माशि १ दिनांक ३०.६.२००३
३. कार्यालयाचे पत्र क्रं. माध्य३/(१४)नमाशा/मान्यता/पुवि/१३८९५/९८/ २००४ दिनांक १७.६.२००४ व २७.८.२००४

वरील संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१, ३.२ व ३.३ अन्वये **जय मल्हार शिक्षण संस्था, ढोकसांगवी, ता. शिरुर, जि. पुणे** संस्थेच्या **स्व. आबासाहेब पाचंगे विद्यालय,** ढोकसांगवी, ता. शिरुर, जि. पुणे माध्यमिक शाळेच्या इयत्ता आठवी च्या वर्गास २००२ - २००३ या शैक्षणिक वर्षासाठी जून २००२ पासून प्रथम मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता खालील अटींची पूर्तता अधिन राहून देण्यात येत आहे. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी खालील अटींची पूर्तता शाळा करीत आहे किंवा कसे याची तपासणी करुन पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठवितांना खालील अटी पूर्ण केलेल्या आहेत किंवा कसे याबाबतही अहवाल प्रस्तावासोबत पाठविण्यात यावा.

१. संस्थेने स्वतःच्या मालकीची शैक्षणिकदृष्ट्या योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करुन घ्यावी.
२. मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तीची नेमणूक करावी.
३. स्वतंत्र व विषयवार प्रयोगशाळा सर्व साहित्यानीशी उपलब्ध करुना घ्यावी.
४. स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करुन दरवर्षी अधिक ग्रंथांची भर घालावी.
५. विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन घ्यावे.
६. पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग उपलब्ध करुन घ्यावा.
७. स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करुन घ्यावी.
८. वाढीव फी चे दर मा. शिक्षण उपसंचालक पुणे विभाग, पुणे १ यांचेकडून मंजूर करुन घ्यावेत.
९. शालेय रेकॉर्ड माध्यमिक शाळा संहिता नियमाप्रमाणे ठेवून त्यात अद्ययावत नोंदी घेण्यात याव्यात.
१०. कर्मचा-यांना सरकारी वेतनश्रेणी नुसार वेतन अदा करावे.
११. शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडावीत.
१२. विद्यार्थ्यांची वैद्यकिय तपासणी करावी.
१३. तपासणी अहवालातील सुचनांची पूर्तता करावी.
१४. पालक शिक्षक संघाची स्थापना करावी.
१५. विद्यार्थ्यांसाठी संगणक सुविधा उपलब्ध करावी.
१६. विद्यार्थी संख्या वाढवावी.
१७. सोबतच्या त्रूटींची पूर्तता करण्याच्या अटीवरच सदरची प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

मूळप्रतीवर शि. उ. सं. यांची सही असे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे -१ करिता

प्रत - १. मुख्याध्यापक,
स्व. आबासाहेब पाचंगे विद्यालय, ढोकसांगवी, ता. शिरुर, जि. पुणे
२. निवडनस्ती

पुणे जिल्हा परिषद, पुणे.
"यशवंतराव चव्हाण भवन"
शिक्षण [माध्यमिक] विभाग.
जा.क्र.शिक्षण/माध्य/ह-४/
नै.वाढ/०३-०४
पुणे. दिनांक : १०/६/२००४

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
स्व. आबासाहेब पाचंगे विद्यालय,
टाकळी-सांगवी, ता. शिरूर, जि. पुणे.

2003-04 - इ.९ वी
विषय : नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत. २००४-०५ - इ.१० वी.
===== ~~इ.६ वी, इ.७ वी,~~ इ.९ वी, इ.१० वी.
=========================================

आपल्या जय मल्हार शिक्षण संस्था, टाकळी-सांगवी, ता. शिरूर, पुणे. या शैक्षणिक संस्थेव्दारा संचलित स्व. आबासाहेब पाचंगे विद्यालय, टाकळी-सांगवी, शिरूर. माध्यमिक विद्यालयास इ.८ वी/~~इ.५ वी~~ चा वर्ग सुरू करणेस सन २००२-०३ या शैक्षणिक वर्षापासून मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचेकडील आदेश क्र.माध्य/३[१४]/~~नामशा~~/मान्यता/पुव/१३०५/०६ दि. २७/५/०४ व दि. २७/५/०४ नुतनीकरणाने अन्वये शासनाची परवानगी मिळालेली आहे. सन 2003-04च्या शैक्षणिक वर्षापासून इ.९ वीस व सन २००४-२००५ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत ~~इ.६ वी, इ.७ वी, इ.९ वी~~, इ.१० वी चा वर्ग नैसर्गिक वाढीने सुरू होत आहे. सदर वर्गास जून २००४ पासून नैसर्गिक वाढीने परवानगी देणेत येत आहे. तरी आपण सदर वर्गाची वार्षिक तपासणी करून घेणेसाठी संबंधित उपशिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, पुणे/~~गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती~~ यांचेशी संपर्क साधावा. तसेच शाळेची वेळेत तपासणी करून घेवून तपासणी अहवाल त्वरित या कार्यालयाकडे सादर करणेत यावा.

ज्या माध्यमिक शाळांमध्ये नैसर्गिक वाढीने इ.१० वी चा वर्ग सुरू होत आहे, अशा सर्व माध्यमिक शाळांनी मा. विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे १० यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा.

त्याप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता वेळेत करावी अन्यथा शाळेस संकेतांक न मिळाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही, याची नोंद घेणेत यावी.

शिक्षणाधिकारी [माध्यमिक]
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, पुणे ~~करिता~~.
पुणे जि. प. पुणे